aglasem.com

FOR KARNATAKA CLASS 10 PREPARATION

Karnataka SSLC Model Question Paper 2027 for Marathi First Language (Paper 3) Key Answers

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
Karnataka Class 10	2027	Answer Key	Marathi

ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು - 560 003

KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD,
MALLESHWARAM, BENGALURU - 560 003

SSLC MODEL QUESTION PAPER-3 2026-27

ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು
MODEL ANSWERS

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M** Code No. : **08-M**

ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

Subject : First Language — MARATHI

[ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100 [**Max. Marks : 100**

प्रश्न क्र.	अचूक उत्तरे	गुण
I.	**पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.** **6x1=6**	
1	खालीलपैकी स्वर संधीचे उदाहरण हे आहे - (अ) तेज:कण (ब) जगन्नाथ (क) परिणयातूर (ड) दुर्बळ **उत्तर : (क) परिणयातूर**	1
2	'मी निबंध लिहिन' या वाक्यातील काळ हा आहे - (अ) भुतकाळ (ब) भविष्यकाळ (क) वर्तमानकाळ (ड) अपूर्ण भुतकाळ **उत्तर : (ब) भविष्यकाळ**	1
3	खालीलपैकी अव्ययीभाव समासाचे उदाहरण हे आहे - (अ) निळकंठ (ब) सर्वज्ञ (क) साखरभात (ड) क्षणाक्षणाला **उत्तर : (ड) क्षणाक्षणाला**	1
4	'ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी' या म्हणीचा अर्थ असा आहे - (अ) उपकारकर्त्याच्या बाजूने बोलू नये (ब) उपकारकर्त्याच्या बाजूने बोलावे (क) कष्टाशिवाय मोठेपण मिळत नाही (ड) अपेक्षेपेक्षा जास्त मिळणे **उत्तर : (ब) उपकारकर्त्याच्या बाजूने बोलावे**	1

5	'कविता लिहिणारा' या शब्दसमुहासाठी एक योग्य शब्द हा आहे- (अ) गायक (ब) कपी (क) वादक (ड) कवी **उत्तर : (ड) कवी**	1
6	'आई आणि बाबा उद्या गावी जाणार आहेत' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ही अ (अ) उभयान्वयी अव्यय (ब) शब्दयोगी अव्यय (क) केवलप्रयोगी अव्यय (ड) क्रियापद **उत्तर : (अ) उभयान्वयी अव्यय**	1
II 7	**पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा. 4 x 1 = 4** स, ला, ते : द्वितीया विभक्ती : : त, ई, आ : ..... **उत्तर : सप्तमी विभक्ती**	1
8	मुलगा निबंध लिहितो : कर्तरी प्रयोग : : मधुला कुत्रा चावला : ..... **उत्तर : कर्मणी प्रयोग**	1
9	चंद्र : सुधांशू : : पृथ्वी : ..... **उत्तर : वसुंधरा, धरती, भूमी, धरित्री इत्यादी.**	1
10	10. थोरला : धाकटा : : डोळस : ..... **उत्तर : अंध**	1
III 11	**खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. 7 x 1 = 7** निरंजनबुवाच्या मठात काकूंना काय म्हणत होते ? **उत्तर : निरंजनबुवाच्या मठात काकूंना 'संगीत काकू' म्हणत होते**	1
12	काकूंचा आकांत पाहून शेजाऱ्यांना काय वाटले ? **उत्तर : लेखकाचा द्वितीय पुत्र रघुनाथ (राघू) कैलासवासी झाला की, काय असे शेजाऱ्यांना वाटले.**	1
13	'गृहिणी मंडळ' या संस्थेच्या जपानमध्ये एकूण किती शाखा आहेत ? **उत्तर : 'गृहिणी मंडळ' या संस्थेच्या जपानमध्ये एकूण 207 शाखा आहेत.**	1
14	पाहुणे म्हणून घरी कोण यावे असे कवीला वाटते ? **उत्तर : पाहुणे म्हणून पंढरीचा राजा पांडुरंग यावे असे कवीला वाटते.**	1
15	कवी कावळ्याचे पाय कशाने मढविणार आहेत ? **उत्तर : कवी कावळ्याचे पाय सोन्याने मढविणार आहेत.**	1
16	'गाऊ त्यांना आरती' या कवितेचे मुल्य काय ? **उत्तर : 'गाऊ त्यांना आरती' या कवितेचे मूल्य व्यक्तिमाहात्म्य हे आहे.**	1
17	दु:खाची ज्योत कशी तेजाळते ?	1

	उत्तर : दु:खाची ज्योत रसरसुन तेजाळते.	
IV 18	**खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा.** **3 x 2 = 6** **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (साधारण)** अ) पांग फेडणे ब) इशारा देणे **उत्तर : अ) पांग फेडणे – उपकार फेडणे. (1)** **ब) इशारा देणे – सूचना देणे. (1)** **(वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग व्हावा, अर्थाचा नव्हे)** **(अर्थ सांगणे $\frac{1}{2}$ गुण, वाक्यात उपयोग $\frac{1}{2}$ गुण**	2
19	**अलंकार ओळखून लक्षणे लिहा. (साधारण)** **"हटा तटाने पटा रंगवुनि जटा धरिशि का शिरी"** **उत्तर : अनुप्रास अलंकार** लक्षणे : जेव्हा एखाद्या वाक्यात किंवा कवीतेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे भाषेला सौंदर्य प्राप्त होते तेव्हा अनुप्रास अलंकार होतो.	2
20	**गण पाडून व्रत्त ओळखा. (साधारण)** **"सहज हवन होते नाम घेता फुकाचे"** **उत्तर :** स ह ज | ह व न | हो ते ना | म घे ता | फु का चे U U U | U U U | - - - | U - - | U - - वृत्त : मालिनी 1 **लक्षणे:** 1 अक्षरसंख्या : 15 गण : न, न, म, य, य यती : 8 व्या अक्षरावर	2
V 21	**खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.** **7 x 2 = 14** **'अनंतशक्ति परमेश्वरु' या कथेचे तात्पर्य कोणते ?** **उत्तर :** प्रत्येक आंधळ्याला हत्ती जसा भासला तसे हत्तीचे वर्णन केले. त्याचप्रमाणे ज्याला जी शक्ति प्रकाशली त्या शक्तिलाच परमेश्वर मानतो. ज्ञानी मनुष्य मात्र म्हणतो की, ही परमेश्वराची एक एक शक्ती होय, पण परमेश्वर नव्हे. अशा सर्व शक्तींनी युक्त तो परमेश्वर असतो.	2
22	**'आत्मविश्वासासारखी दुसरी दैवी शक्ती नाही' असे आंबेडकर का म्हणतात ?** **उत्तर :** आत्मविश्वासाला आंबेडकर दैवीशक्ती मानतात. कारण माणसाला स्वत:च्या	2

	प्रगतीसाठी कोणत्याही बाहय चमत्काराची किंवा दैवी शक्तिचे गरज नसते. तर फक्त स्वत:वर विश्वास असणे आवश्यक असते. आत्मविश्वासाच्या जोरावर जीवनातील अनेक संकटावर मात करता येते. अपयश आले तरी निराश न होता मनुष्य पुन्हा जोमाने प्रयत्न करु लागतो. स्वत: आंबेडकरांनी जीवनातील प्रतिकुल परिस्थितीवर आत्मविश्वासाच्या जोरावर मात केली. याचा दाखला देतात.	
23	**अनंत काणेकर यांचा परिचय लिहा.** **संदर्भ :** अनंत आत्माराम काणेकर (1905-1980) हे पुरोगामी विचारसणीचे कवी व लेखक. कविता, विडंबने, निसर्ग कविता त्यांनी लिहीली आहेत. 'चांदरात' हा त्यांचा कवितासंग्रह आहे. 'चित्रा', 'आशा' या साप्ताहिकांचे ते संपादक होते. 'शिंपले आणि मोती तुटलेले तारे, पिकली पाने' हे लघुनिबंध संग्रह आहेत. 'धुक्यातून लाल ताऱ्याकडे, आमची माती आमची आकाश' ही प्रवास वर्णने लिहीले. मोरपिसे, रुपेरीवाळू हे कथासंग्रह व 'निशिकांताची नवरी' हे नाटक लिहीले. 1957 च्या औरंगाबाद येथील साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषविले.	2
24	**"करायच्या तर तीन वाटण्या करा" संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **उत्तर : संदर्भ :** प्रस्तुत संदर्भ 'वाटणी' या पाठातील असून या पाठाचे लेखक रा.र.बोराडे हे आहेत. **स्पष्टीकरण :** गणतात्यांची दोन्ही मुले दोन वाटण्या करण्यास सांगतात. तिसरी वाटणी ते करायला ते तयार नसतात. पण ते गणातात्यांना मान्य नसते. गणातात्यांना स्वत:साठी तिसरी वाटणी हवी असते. म्हणून देवबा पाटलांना तिन वाटण्या करण्यास सांगतात.	2
25	**गुराख्याच्या जीवाची आग का होते ?** **उत्तर :** लहान वयातच गुऱ्याख्यावर गाई राखण्याची जबाबदारी येते. जेव्हा तो गाई चारण्यासाठी रानात जातो तेव्हा गाई माळरानावर इकडे-तिकडे विखुरतात किंवा चरण्यासाठी पांगतात तेव्हा त्या गाई गुरांना एकत्र करताना त्या लहान गुराख्याची दमछाक होते, तो खुप बेजार होतो. आणि रागामुळे त्याच्या जीवाची आग होते.	2
26	**कवी केशवकुमार यांचा परिचय लिहा.** **उत्तर :** केशवकुमार (1898-1969) यांचे पूर्ण नाव प्रल्हाद केशव अत्रे होय, यांनी वाड्याच्या विविध क्षेत्रातून संचार केला. ते कवी, नाटकार, दिग्दर्शक, प्राध्यापक, विनोदी लेखक, प्रभावी व्यक्ते विडंबनकार म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांची 'मी उभा आहे,' 'लग्नाची बेडी', 'भ्रमाचा भोपळा', 'उद्याचा संसार' इत्यादी नाटके गाजली. त्यांचे 'कऱ्हेचे पाणी' हे आत्मचरित्र व 'झेंडूची फुले' हा विडंबन गीतांचा काव्यसंग्रह आहे. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'श्यामची आई' या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला. 1942 साली नाशिक येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले.	2

27	**'आम्ही भुके जीव ! देतसू इशारा' संदर्भासह स्पष्टीकरण करा.?** **संदर्भ :** वरील संदर्भ 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' या कवितेतील असून या कवीतेचे कवी विंदा करंदीकर हे आहेत. **स्पष्टीकरण :** वरील ओळीतून कवीने भूकेलेल्या जीवाची वेदना मांडली आहे. हे भूके जीव भूकेने व्याकूळ झाले आहेत. त्यांची भूक सहनशिलतेच्या पलीकडे गेली आहे. त्यामुळे ते भूक भागविण्यासाठी वाटेल ते मार्ग अवलंबविणार आहेत. त्या मार्गत देवाने येऊ नये असा इशारा देवाला देतात. अन्यथा त्यांना देकरक्त ही वर्ज्य नाही.	2
VI 28	**खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1 x 3 = 3** अ) विद्वान सर्वत्र पुज्यते **किंवा** ब) पुष्पासंगे मातीस वास लागे **उत्तर : कल्पनाविस्तार (उत्तराचे मुद्दे)** **i) कल्पनेचा अर्थ :** 1 **ii) उदाहरण व स्पष्टीकरण :** $1\frac{1}{2}$ **iii) तात्पर्य :** $\frac{1}{2}$	3
VII 29	**खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा.** **10 x 3 = 30** **वसईच्या किल्ल्यातील रहस्य (भेद) जाणून घेण्यासाठी कोणीकोणी कसे प्रयत्न केले ?** **उत्तर :** वसई किल्ल्यातील भेद जाणून घेण्यासाठी खंडोजी माणकर यांनी गुराख्याचे काम स्विकारले. रोज किल्ल्यात जाऊन लोकांची गुरे राखायचे आणि किल्यातील गुप्त माहिती मिळावायची. दुसरे सरदार अंजुरकर पंचकळसे यांनी सुतारकाम पत्करले व किल्यात जाऊन सुतारकाम करावयाचे व माहिती मिळवायचे. तिसरे सरदार दुल्लबाजी मोरे यांनी कासारपण पत्करले. रोज किल्यात लोकांच्या बायकास बांगडया भरुन तेथील गुप्त माहिती मिळवायची. अशा प्रकारे वरील तिन्ही सरदारांनी किल्यातील भेद जाणले.	3
30	**जपानमधील 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.** **उत्तर :** 'मदर्स युनियन' ही जपानमधील म्हत्वाची संस्था आहे. तीन मजली इमारत आहे. पाहिल्या मजल्यावर मदर्स युनियनचे ऑफीस होते. दुसऱ्या मजल्यावर पालकांची संस्था आणि तिसऱ्या मजल्यावर शिक्षकांच्या संघटनेचे ऑफीस होते. मदर्स युनियनच्या अध्यक्षा 70-75 वर्षांच्या होत्या. पण त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह तृप्ती जाणवत होती. 1945 साली जेव्हा हिरोशिमावर बॉम्ब हाल्ला झाला तेव्हा अनेक घरे जमीनदोस्त झाली. कित्येक संसार धुळीला मिळाले. तरुणांची संख्या कमी झाली. आईबापाविना, घरादाराविना पोरक्या झालेल्या मुलांना आश्रय देण्याच्या हेतुने या संस्थेची स्थापना करण्यात आली.	3
31	**शिक्षणामुळे आदिवासी मुलांच्या वर्तनात कोणता बदल झाला होता ?** **उत्तर :** शिक्षणामुळे अदिवासी मुलांच्या वर्तनात नवचैन्याऐवजी कमालीचं नैराश्य आणि	3

	मरगळ जाणवत होती. शिकल्यामुळे शेतात काम करायची लाज वाटत होती. बदल झाला होता तो फक्त बाहय पोशाखात, अर्धी चड्डी, गंजीफ्रॉक अशा वेशात फिरणारी मुलं जिनची पँट, पूर्ण बाह्याचा शर्ट, आणि तोंडात गुटखा, डोळयावर गॉगल लावून हिंडायला लागली होती. शहरात कुठं तरी तात्पुरत्या स्वरुपाची मोलमजुरी करुन चैन करायला शिकली होती.	
32	**ज्योतिबांनी सावित्रीबाईना कशा तऱ्हेने शिकविले ? सविस्तर लिहा.** **उत्तर :** सावित्रीबाई ज्योतिबांना म्हणतात "मला वाचाया शिकवाल ?" यावर ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाईंना शिकविण्याचे हमी देतात. दोन चार दिवसानंतर नगरला जावून फरार नावाच्या शिक्षिकेकडून कशा पध्दतीने शिकवावयाचे याचे मार्गदर्शन घेतात. त्यानंतर पाटी, पुस्तक, पेन्शील घेवून येतात. पाटीवर 'शे-ट-जी' असे अक्षरे लिहून ते गिरवायला सांगतात. क, ख, ग, घ, त, थ, द, ध ही मुळाक्षरे शिकवतात. वेलांटी, ऊकार, पाढे, हिसेब सर्व कांही शिकवतात. बेरीज, वजाबाकी शिकवीले त्यानंतर पुढे सावित्रीबाई फुले पुण्यातील मुलींच्या शाळेत शिक्षिका म्हणून कार्य करु लागले.	3
33	**'अण्णा वारल्यावर आईचे जगच खल्लास झाले होते' याचा अर्थ स्पष्ट करा.** **उत्तर :** 'तू मरत का नाहीस' असे दिवसातून अनेक वेळा आपल्या पतीला म्हणणारी अक्का खरोखरच जेव्हा तिचा पती मरण वारतो त्यावेळेस ती खूप शोकमग्न दिसत होती. अतिशय उद्विग्न स्थितीत ती वावरत होती. तिच्या काळजात आपल्या पतीविषयी अपार प्रेम व श्रद्धा दिसत होती. परिस्थितीने व्याकुळ झालेली अक्का जमिनीवर डोके आपटून आक्रोश करीत होती. 'वाघासारखा माझा नवरा गेला' अशा शब्दात ती आपल्या काळजात खोलवर रुतलेला व कधीही विस्मरणात न जाणारा आपला नवरा व्यक्त करायची. आपल्या पतीच्या निधनाने जणू तिचे जीवन उद्ध्वस्त झाले होते. तिचे जगणेच निरर्थक झाले होते.	3
34	**श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?** **उत्तर :** श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रुक्मिणीने अनेक वृत्त केले, नियम धरले. देव, गुरु व ब्राह्मणाची मनोभावी पुजा केली. ऐवढे करुन ही जर श्रीकृष्णाची प्राप्ती झाली नसेल तर ती जीभ हासडुन जीव देणार आहे व पुढे शंभर जन्म घेवून उग्र तपश्चर्या करणार आहे आणि प्रत्येक्ष भगवान शंकरही ज्याला वंदन करतो. अशा श्रीकृष्णाचे पाय (श्रीकृष्णाला) प्राप्त करणार आहे.	3
35	**'भगवंत भुकेला भक्तीचा पाहुना' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.** **उत्तर :** ढोंगी साधु भक्तीचा अवडंबर माजवितात. त्यांच्यामध्ये पमरेश्वराविषयी कांहीही अपुलकी नसते. अशा ढोंगी साधुला रामजोशी यांनी परमेश्वराची मनापासून भक्ति करण्याचा सल्ला देतात. भगवंत भक्ताकडून कधीच कोणत्याही प्रकारची अपेक्षा ठेवत नाही. शुद्ध आचरण व सत्य वचन हेच परमेश्वराला अपेक्षीत असते. भक्तिचे ढोंग करण्याऐवजी परमेश्वराची मनोभावे सेवा केलीतर तीच खरी भक्ति होय. अशा ढोंगी भक्तित वेळ घालवण्यापेक्षा परमेश्वर चिंतनात वेळ घालवणे यातच जीवनाचे सार्थक आहे. कारण देव भक्तिचा भूकेला आहे.	3

36	**मार्कंडेयाची तुलना कवीने देशभक्तांशी का केली आहे ?** **उत्तर** मार्कंडे ऋषी अल्पायुषी होते. मात्र शंकराच्या कठोर उपासनेने दिर्घायुष्यी बनले. संपूर्ण जीवन निस्वार्थ भावनेने लोकांच्या कल्याणासाठी समर्पीत केले. त्याचप्रमाणे देशभक्तही निस्वार्थ भावनेने देशाची सेवा करतात. देश हाच त्यांच्यासाठी देव असतो. देशांची सेवा करणे हाच त्यांचा धर्म असतो. मार्कंडे आणि देशभक्त या दोघामध्येही त्याग, धैर्य, कठोर साधना, जनकल्याणाची भावना यात समानता आहे. म्हणून मार्कंडेयाची तुलना देशभक्तांशी केली आहे.	3
37	**'धुळीचेच आहे मला भूषण' असे पृथ्वी का म्हणत आहे ?** **उत्तर :** पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून चंद्र, तारे, शुक्र, मंगळ, धुमकेतू हे ग्रह वेगवेगळया प्रकारे प्रेमयाचना करीत आहे. पण पृथ्वीला मात्र या सूर्यापुढे वरील सर्वांचे तेज फिके वाटते, ते दुर्बल वाटतात म्हणून या दुर्बळांच्या प्रेमाला स्विकारण्यापेक्षा सूर्याचे दुरपण स्विकाराही तयार आहे. आपल्यापुढे सूर्याची थोरवी अमर्याद आहे याची तिला जाणीव आहे. सूर्यासमोर आपण धुळीसमान आहोत अशी तिला वाटते. परंतु असे असले तरी अलंकार म्हणून तिच सूर्याला शोभुन दिसणार आहे. सूर्याचे पाय अलंकारण्यासाठी तिच अलंकार म्हणून शोभुन दिसणार आहे. याचे तिला भुषण वाटते. त्यामुळे आपण जरी शुल्लक असलो तरी सूर्यासारख्या तेजस्वि मित्राची साथ मिळणे स्वत:ला ती भाग्यवान समजते.	3
38	**'धरण' कवितेत स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे?** **उत्तर :** 'धरण' कवितेत कवी दया पवार यांनी कष्ट करूनही उपाशी राहणाऱ्या ग्रामीण भागातील स्त्रियांच्या वेदना मांडल्या आहेत. ग्रामीण भागातील स्त्रियांना भल्या पहाटे उठून दळण-कांडण, स्वयंपाकपाणी करावे लागते. तिच्याकडे धान्य कमी असल्यामुळे कणी कोंड्याचा स्वयंपाक करावा लागतो. यातून तिची गरीब परिस्थिती दिसून येते. तान्हे लेकरू वेताच्या बुट्टीखाली झोपवून तिला भर उन्हात धरण बांधण्याचे काम करावे लागते. उन्हाचे चटके पायाला बसू नयेत म्हणून तिच्याकडे चपला देखील नाहीत. त्यामुळे ती पायाला झाडाचा पाला बांधून काम करते. धरणातील पाण्याचा उपयोग करून शेतकरी, उद्योगपती सर्वांचे जीवन सुधारले मात्र कष्ट करून देखील या स्त्रियांना पिण्याच्या घोटभर पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. कष्ट करूनही त्यांच्या जीवनात सुखाचे क्षण लाभत नाहीत. नेहमी संघर्ष करावा लागतो. या सर्वांतून तिची गरीब परिस्थिती दिसून येते.	3
VIII 39	**खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा.** **4 x 4 = 16** **'हिरवे सांगाती' या शीर्षकाची यथार्थता स्पष्ट करा.** **उत्तर :** 'हिरवे सांगाती' या पाठात लेखक गुलजार यांनी पिंपळ, जांभूळ, पपई, चाफा, गुलमोहर या झाडांची वैशिष्ट्ये व त्यांच्याविषयी आठवणी सांगितलेल्या आहेत. सुरुवातीला या पृथ्वीतलावर वनस्पतीच्या रुपाने पहिला जीव जन्माला आला. त्यानंतर हळूहळू उत्क्रांती होत मानवाची निर्मिती झाली. यावरून झाडांशी आपले फार पूर्वीपासून	4

	आपले कौटुंबिक नाते असल्याचे लेखक पटवून सांगतात. झाडे ही अधिक चैतन्यशील असतात. झाडांच्या संगतीत माणूस अधिक खुलतो. झाडे, वनराई, शेती, हिरवळ यामुळे माणसाला अधिक समाधान व शांती मिळते. झाडे सावली, फळे, फुले देतात. विविध प्रकारे माणसाला उपयोग पडतात. संकटाच्या काळी उभारी देतात. म्हणून झाडांशी आपले कौटुंबिक स्नेहाचे नाते जडले आहे. हिरवा रंग निसर्ग, ताजेपणा, समृद्धी आणि नवचैतन्य यांचे प्रतीक मानला जातो. तर 'सांगाती' म्हणजे सोबत चालणारे, साथ देणारे जीवन प्रवासातील सहचर. त्यामुळे 'हिरवे सांगाती' शीर्षकातून झाडे ही मानवाच्या जीवनप्रवासातील आधार देणारे सोबती आहेत असा अर्थ सूचित होतो. म्हणून 'हिरवे सांगाती' हे शीर्षक पाठात आलेल्या आशयाची अधिक अर्थपूर्ण, सूचक, सुसंगत व यथार्थ आहे. **किंवा** **'हिरवे सांगाती' या पाठात आलेल्या सर्व वृक्षांची वैशिष्टये लिहा.** **उत्तर : पिंपळ** हा पुरातन वृक्ष आहे. त्यातील रेणु मानवी शरीरातील रेणुशी मिळते जुळते आहे. याचा प्रत्येक अवयव औषधी गुणधर्मासाठी वापरला जातो. पिंपळाला पूर्वजांनी देवाचे रुप दिले आहे. **जांभूळ** हा लेखकाच्या लहानपणीचा गारवा आहे. जांभाळाच्या झाडाजवळ खेळताना लेखकाला आजोबाजवळ खेळण्याचा भास होतो. तो आपणास अशीर्वाद देत आहे असे वाटते. **कडूनिंब** या झाडाची पांढरी छोटी-छोटी फुले लेखकाला झुंमक्यासारखे वाटतात. **पपई** हे झाड तीन वेळा फळे दिले की, ते झाड मरते. **गुलमोहर** या झाडाची सुरवातीला विशेष काळजी घ्यावी लागते. **चाफा** या झाडाची कुठलीही फांदी किंवा पान तोडले की, दुधासारखा पांढरा चीक निघतो म्हणून त्याला लेखक 'बडी माँ' असे म्हणतात. या झाडाची गंमत म्हणजे फुलं आले की, पानं गायब होतात आणि पान येतात तेव्हा फुलांचा पत्ता नसतो. तो पाना-फुलांचा लपंडाव पाहताना खुप मजा वाटते की, बडी माँ च्या अंगाखांद्यावर त्या पानाफुलाचं बागडणं चालू आहे. **बांबु**च्या वनातला वारा 'सोंय सोंय' असा शीळ घालतो. जणू काही तो 'साई साई' असे देवाचे नाव घेत आहे असे लेखकाला वाटते. ही बांबूची झाडं खुप वर्ष बांबू देतात. जेव्हा बांबुच्या वनाचा नाश व्हायची वेळ येते तेव्हाच बांबूला फुले येतात हे त्याचे वैशिष्ट्य लेखक सांगतात.	
40	**गंगूबाईनी संगीत शिक्षणासाठी कशाप्रकारे कष्ट घेतले? व त्यांची गुरुनिष्ठा कोणत्या प्रसंगातून दिसुन येते ?** **उत्तर :** गंगूबाई हनगल यांना संगीत शिक्षणाचे बाळकडू घरातूनच मिळाले. त्यांची आई अंबाबाई यांनी गंगूबाईवर संगिताचा पहिला संस्कार केला. लहानपणापासून त्यांना गायनाची आवड होती. अब्दुल करीम खाँ, द.रा. बेंद्रे गुरुजी यांनीही वेळोवेळी त्यांना संगीत शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. शालेय शिक्षणानंतर हुबळीला कृष्णाचार्य हुलगूर आणि कुंदगुळ येथे सवई गंधर्व यांच्याकडून संगीताचे धडे घेतले. त्यांचा आवाज अतिशय नाजूक,	4

	पातळ व बारीक असल्याकारणाने त्या गाऊ लागल्या की त्यांचा गळा दुखत असायचा. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना गळ्यावर शस्त्रक्रिया करून घ्यावी लागली. त्याचा परिणाम त्यांचा आवाज पुरुषी झाला पण त्यांनी गाणे न थांबविता पुन्हा रियाज करून आपला आवाज पूर्ववत प्राप्त केला. पहाटे उठून दोन-दोन तास खर्जाचा रियाज करत असत. अशा प्रकारे त्यांनी संगीत शिक्षणासाठी वेगवेगळे कष्ट घेतले. सवाई गंधर्व आपल्या मुलाच्या औषधपाचारासाठी हुबळीला गंगूबाईंच्या घरी राहिले. पण गंगूबाईने त्यांच्याकडून भाडे घेतले नाही व आपली मुलगी कृष्णा हिला त्यांच्याकडे शिकवणी लावून त्याची पन्नास रुपये फी दिली. यातून त्यांची गुरुनिष्ठा दिसून येते. **किंवा** **शारदांबेचा आशीर्वाद खऱ्या अर्थाने आपल्याला मिळाला, असे गंगूबाईला का वाटले ? ते सविस्तर लिहा.** **उत्तर :** हुबळीतील डॉक्टर वागळे यांच्या घरी श्रृंगेरी मठाचे शंकराचार्य आले होते. तेथे त्यांनी गंगूबाईचे गाणे ऐकले. गाणे ऐकून ते इतके प्रभावीत झाले की, गंगूबाईना गायणासाठी श्रृंगेरीस येण्याचे अंमत्रण दिले. एकदा गंगूबाई गाण्याच्या कार्यक्रमासाठी श्रृंगेरीला गेल्या. तेव्हा शंकराचार्य देखील गाणे ऐकण्यासाठी तेथे येवून बसले होते. गाणे ऐकून ते खूप आनंद झाले. शंकराचार्य यांनी गंगूबाईना मठात बोलावले. शारदांबेच्या अंगावरील एक वस्त्र आणि साडी चोळी दिली. त्या दिवशी शारदांबेचा आशीर्वाद खऱ्या अर्थाने आपल्याला मिळाला असे गंगूबाईना वाटले. एक मौलिक ठेवा म्हणून गंगूबाईनी ते वस्त्र अनेक वर्षे जपून ठेवले.	
41	**'या भारतात बंधुभाव' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा. (कठीण)** **उत्तर :** 'या भारतात बंधुभाव' या कवितेत संत तुकडोजी महाराजांनी भारतात एकता नांदावी, बंधुभाव रहावा अशा प्रकारचा आशीर्वाद परमेश्वराकडे मागितला आहे. देशातील सर्व पंथ, संप्रदाय यांच्यात मतभेद असू नयेत, त्यांच्यात एकता असावी, गरीब-श्रीमंत एका विचाराने रहावेत, सर्व लोक गुण्यागोविंदाने रहावेत, हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख या सर्व धर्मांतील लोकांत सामंजस्य असावे, सर्वांना स्वातंत्र्याचे सुख लाभावे. प्रत्येकाच्या मनात मानवता, राष्ट्रभावना रुजावी. सामुदायिक प्रार्थना व्हाव्यात, देशातील तरूण उद्योगी व शीलवान असला पाहिजे. अशा प्रकारचा आशीर्वाद परमेश्वराकडे ते मागतात. देशातील जातीयता, अस्पृश्यता मुळापासून नष्ट व्हावी, खलनिंदकाच्या मनातही सत्याची, न्यायाची भावना निर्माण व्हावी. प्रत्येक घरा-घरात स्वर्गीय आनंद नांदावा, देशातील संकटे नष्ट व्हावीत, देशात भयमुक्त वातावरण असावे, समाजात शांतता रहावी अशा प्रकारे एका समृद्ध अशा समाजाची अपेक्षा कवीने केली आहे. यातून त्यांची राष्ट्रभक्ती व जनकल्याणाची तळमळ दिसून येते.	4

42	**खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.** **उत्तर :** उरि जेव्हा ज्वालारस झेलून धरतीने तप केले दारुण सुकता सुकतां नद्या म्हणाल्या हाच विश्वसंहार पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार त्या काळी धरणीच्या पोटी **किंवा** म्हटले स्वागतगीत खगांनी केला मुजरा लवून ढगांनी लाल मातीचा गुलाल उधळित पवन करी संचार पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार कोसळली सर दक्षिण उत्तर	4
IX 43	**खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.** **1 x 4 = 4 (2+2)** आजच्या भारताला अशा तरुणांची गरज आहे, ज्यांचे स्नायू लोखंडासारखे मजबूत आणि मज्जातंतू पोलादासारखे कणखर असतील. केवळ ग्रंथ वाचून किंवा पदव्या मिळवून देशाचा उध्दार होणार नाही, तर त्यासाठी मन आणि मनगट दोन्ही सशक्त हवेत. तरूणांनी स्वत:मधील सुप्त शक्तिवर विश्वास ठेवला पाहिजे. 'मी हे करु शकत नाही' हा विचारच मुळात पाप आहे. जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही. कारण सर्व शक्ति तुमच्या अंत:करणात वास करत आहे. जोपर्यंत तुम्ही स्वत:वर विश्वास ठेवत नाही, तोपर्यंत देवावर विश्वास ठेवणे व्यर्थ आहे. संकटे ही माणसाला घाबरवण्यासाठी येत नसतात, तर त्याच्यातील धैर्याची परीक्षा घेण्यासाठी येत असतात. उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका, हा संदेश केवळ घोषणेपुरता मर्यादित न ठेवता तरुणांनी तो आपल्या आचरणात आणला पाहिजे. जेव्हा देशातील तरुण स्वाभिमानी, नीतिमान आणि कष्टाळू बनेल, तेव्हाच आपला देश जगाच्या पाठीवर महासत्ता म्हणून अभिमानाने उभा राहील. **प्रश्न : अ) लेखकाच्या मते आजच्या भारताला कशाप्रकारच्या तरुणांची गरज आहे?** **उत्तर :** लेखकाच्या मते दुर्बल शरीराने कोणतेही मोठे कार्य होवू शकत नाही. त्यामुळे तरुणांचे स्नायू लोखंडासारखे मजबूत आणि मज्जातंतू पोलादासारखे कणखर असतील अशा तरुणांची देशाला गरज आहे. कोणत्याही संकटात खचून न जाता धैर्याने तोंड देण्याची	

	मानसिक ताकद तरुणामध्ये असायला हवी. थोडक्यात आजच्या भारताला शारीरिकदृष्टया बलवान, मानसिकदृष्टया खंबीर व चारित्र्यवान तरुणांची गरज आहे. (02) **ब) तरुणांनी स्वत:वर विश्वास ठेवणे का गरजेचे आहे ?** **उत्तर :** जोपर्यंत तरुणांचा स्वत:वर विश्वास नाही तोपर्यंत देवावर विश्वास ठेवणे व्यर्थ आहे. प्रत्येक तरुणांच्या आत अनंत शक्ति आणि ऊर्जा दडलेली असते. त्या शक्तिची जाणीव केवळ दृढ आत्मविश्वासाने होवू शकते. स्वत:ला कमकुवत समजने हा सर्वात मोठा गुन्हा आहे. तरुणांनी स्वत:ला कधीही दुर्बल मानू नये. नेहमी सकारात्मक विचार करावा व भीतीवर मात करावी. तरच जीवनात ध्येय प्राप्त करता येते. (02)	
X 44	**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा.** **1 x 5 =5** शाळेच्या शैक्षणिक सहलीला जाण्यासाठी परवानगी (संमती) मागणारे पत्र तुमच्या वडिलांना लिहा. किंवा तुमच्या मोठ्या बहिणीचे लग्न असल्यामुळे तुम्हाला चार दिवसाची रजा हवी आहे. त्यासाठी तुमच्या वर्गशिक्षकांना रजेचा अर्ज लिहा. **उत्तर : पत्र :** i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1 ii) मायना 1 iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2 iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$ v) कोणाला पत्र पाठवावयाचे त्याचा पत्ता $\frac{1}{2}$ **किंवा** **अर्ज :** i) प्रेषक पत्ता (अर्ज लिहीणाऱ्याचा पत्ता व दिनांक) 1 ii) मायना (अधिकाऱ्याचा हुद्दा) 1 iii) विषय $\frac{1}{2}$ iv) मजकूर 2 v) सही व पत्ता $\frac{1}{2}$	5

XI 45	**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा.** **1 x 5 = 5** **अ) पर्यावरण संवर्धन – काळाजी गरज.** **ब) मी शिक्षक झालो तर….. !** **उत्तर :** निबंध लेखनाचे मुद्दे : i) आकर्षक प्रारंभ 1 ii) विषयज्ञान 2 iii) भाषासौंदर्य 1 iv) शेवट 1	5